# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : **srapune@yahoo.in** वेबसाईट : **www.srapune.gov.in**

जा.क्र.झोपुप्रा/आस्था/१८१८/२०१६
दिनांक - ०८/११/२०१६.

<u>कार्यालयीन आदेश क्र.</u> -१८५

विषय : मे. सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालय, विशेष न्यायाधिकरण, बांद्रा, मुंबई व दिवाणी न्यायालय मधील प्रकरणांमध्ये लेखी म्हणणे व त्यावरील प्रतिज्ञापत्र दाखल करणेस प्राधिकृत करणेबाबत...

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३(अ) अन्वये महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. झोपुयो-२००४/प्र.क्र.-२१३/ झोपसू-१, दि. ३० जून, २००५ रोजी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना करणेत आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(२) अन्वये प्रस्तावास मान्यता दिली असून शासन निर्णय क्र. टीपीएस-१८१२/७८६/प्र.क्र.२६२/१३/पुर्नबांधणी-९०/नवि-१३, दि. ११/०९/२०१४ रोजीचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी विशेष नियमावली अपेंडीक्स-ए अंमलात आणली आहे.

उक्त अधिनियमाचे कलम ३(एस) मध्ये The Slum Rehabilitation Authority or the Chief Executive Officer may, Delegate any of the powers conferred on them by or under this act, to any of the officers of the Slum Rehabilitation authority and permit him to redelegate such power to his subordinate, by general or special order in this behalf, असे नमूद आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची प्रभावी व शीघ्र गतीने अंमलबजावणी करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांना उक्त अधिनियमानुसार विविध अधिकार प्रदान करणेत आलेले आहेत. त्या अनुषंगाने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे यांचेकडून उक्त अधिनियमाच्या तरतुदीन्वये विविध आदेश वेळोवेळी निर्गमित केले जातात व झोपडपट्टी पुनर्वसन

103

योजनेस मान्यता दिल्या जातात. त्यास बाधित होऊन काही झोपडीधारक/जमिन मालक/त्रयस्थ व्यक्ती सदरील आदेश व झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस मे. विशेष न्यायाधिकरण, मे. उच्च न्यायालय, मे. दिवाणी न्यायालय व मे. सर्वोच्च न्यायालय येथे अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन दाखल करतात व तेथे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पक्षकार म्हणून समाविष्ट केले जाते.झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे मधील कामकाजाचा वृद्धता व्याप लक्षात घेता सदरील अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन यांचेमध्ये जलद गतीने लेखी म्हणणे व त्यावरील प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी मी लहुराज माळी, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करीत आहे.

१. अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशनमध्ये जर तांत्रिक बाब समाविष्ट असलेस त्याबाबत सहाय्यक संचालक नगर रचना, झोपुप्रा, पुणे यांनी माझ्यावतीने लेखी म्हणणे व त्यावरील प्रतिज्ञापत्र दाखल करणेस प्राधिकृत करणेत येत आहे.

२. अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन जर झोपडीधारकांच्या पात्रतेविषयी दाखल केले असलेस त्याबाबत संबंधित सक्षम प्राधिकारी, झोपुप्रा, पुणे यांनी माझ्यावतीने लेखी म्हणणे व त्यावरील प्रतिज्ञापत्र दाखल करणेस प्राधिकृत करणेत येत आहे.

३. अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन सर्वसाधारण योजनेबाबत (तांत्रिक + पात्रतेबाबतचे मुद्दे) दाखल केले असल्यास त्याबाबत सचिव, झोपुप्रा, पुणे यांनी माझ्यावतीने लेखी म्हणणे व त्यावरील प्रतिज्ञापत्र दाखल करणेस प्राधिकृत करणेत येत आहे.

त्याचप्रमाणे सदरील न्यायालयीन प्रकरणे या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती निश्चित करणे आवश्यक असल्याने ते येणेप्रमाणे

१) कोणतेही न्यायालयीन प्रकरणे या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर प्रथमत: ते प्रकरण विधी विभागाकडे वर्ग केले जाईल. तद्नंतर सदर प्रकरण विधी विभागास प्राप्त झालेनंतर असे

अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन बाबतचा परिच्छेद निहाय अहवाल संबंधीत सक्षम / तांत्रिक विभागाकडून मागविणे आवश्यक राहील.

२) संबंधीत सक्षम / तांत्रिक विभागाकडून अर्ज/अपिल/रिट याचिका/दिवाणी दावा/स्पेशल लिव्ह पिटिशन बाबतचे परिच्छेद निहाय अहवाल प्राप्त झालेनंतर दिवाणी / विशेष न्यायाधीकरण / उच्च न्यायालय / सर्वोच्च न्यायालय येथील संबंधीत वकीलांना त्याबाबत अवगत करणे त्याचप्रमाणे संबंधीत सक्षम / तांत्रिक विभागाचे अधिकारी व बाजू मांडणारे वकील यांच्यात समन्वय साधणेची कार्यवाही विधी सल्लागार करतील.

३) संबंधीत वकीलांकडून प्रतिज्ञापत्र मसुदा प्राप्त झालेनंतर विधीसल्लागार यांनी सदर प्रतिज्ञापत्राचा मसुदा संबंधीत सक्षम / तांत्रिक विभागाशी चर्चा करून अंतिम करावा व ते साक्षांकित करून संबंधीत न्यायालयात दाखल करावे.

४) प्रकरण परत्वे या न्यायालयात झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे कार्यालयाची बाजू भक्कमपणे मांडणे आवश्यक असल्यास तांत्रिक/सक्षम विभागाचे संबंधीत अधिकारी व विधी सल्लागार यांनी समक्ष सुनावणीचे वेळी अभिलेखासह मे. न्यायालयात हजर सुध्दा रहावे.

सदरचे कामकाज संबंधित अधिकाऱ्यांनी प्रचलित नियमानुसार व कार्यालयीन नस्तींच्या आधारे काटेकोरपणे करणेची दक्षता घ्यावी.

सदरचे आदेश तात्काळ अंमलात येतील.

9.11

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.



D:katkar sir/d copy/anil/aastha